# रविवार

असंख्यात रे भक्त होऊन गेले। तिहीं साधनांचे
बहु कष्ट केले। नव्हे कार्यकर्ता भुमीभार झालों।
तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों।।1।। बहू दास ते
तापसी तीर्थवासी। गिरीकंदरीं भेटि नाही जनांसी।
स्थिति ऐकतां थोर विस्मीत झालों। तुझा दास.।।2।।
सदा प्रेमळासी तया भेटलासी। तुझ्या दर्शनें स्पर्शने
पुण्यराशी। अहंता मनी शब्दज्ञानें बुडालों तुझा
दास....।।3।। तुझ्या प्रीतिचे दास निर्माण झाले।

असंख्यात ते कीर्ति बोलोनि गेले। बहू धारणा थोर चकीत झालों। तुझा दास.।।4।। बहुसाळ देवालयें हाटकाचीं। रसाळ कळा लाघवे नाटकाचीं। पुजा देखतां जाड जीवीं गळालों। तुझा दास.।।5।। कितेकी देह त्यागिले तूजलागीं । पुढें जाहले संपतीचे विभागी। देहेदुःख होतांचि वेगें पळालों। तुझा दास।।6।। किती योगमूर्ति किती पुण्यमूर्ति किती धर्मसंस्थापना अन्नशांती। परस्तावलों कावलो तप्त जालो। तुझा दा.।।7।। सदा सर्वदा राम सोडूनि कामीं। समर्था तुझे दास आम्ही निकामी। बहु स्वार्थबुद्धि न रे कष्टवीलो। तुझा दास.।।8।। जय जय रघुवीर समर्थ।।